# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 कलम 127(1) (अ) च्या
**{मालमत्ता कर विभाग}** तरतूदी अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिन करीता मालमत्ता कर आकारणी करुन मालमत्ता कर रक्कमेची वसूली करण्यात येते.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम 39 अन्वये मालमत्ताधारकास मागणी देयक तामील करणे गरजेचे आहे.

आर्थिक वर्ष 2024-2025 करीता एकूण 705000 मालमत्तेचे सर्वेक्षण झाले असून दोन प्रतीत एकूण 1410000 (कार्यालयीन व मालमत्ता धारकाची प्रत) मागणी देयक छपाई करण्याकरीता मागणी देयकाची Pre-Printed Stationary ची आवश्यकता भासणार आहे.

उक्त स्टेशनरी पुरवठा करण्याकरीता सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. साप्रवि/409/एम. दि. 01/10/2021 अन्वये मंजूर दर असून दर करातील अनु. क्र. 42 अन्वये रु. 1.84/- प्रती शंभर प्रमाणे रु. 2594400/- खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 827/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 12/03/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), मालमत्ता कर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 कलम 127(1) (अ) च्या तरतूदी अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत व जमिन करीता मालमत्ता कर आकारणी करुन मालमत्ता कर रक्कमेची वसूली करण्यात येते.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम 39 अन्वये मालमत्ताधारकास मागणी देयक तामील करणे गरजेचे आहे.

आर्थिक वर्ष 2024-2025 करीता एकूण 705000 मालमत्तेचे सर्वेक्षण झाले असून दोन प्रतीत एकूण 1410000 (कार्यालयीन व मालमत्ता धारकाची प्रत) मागणी देयक छपाई करण्याकरीता मागणी देयकाची Pre-Printed Stationary ची आवश्यकता भासणार आहे.

उक्त स्टेशनरी पुरवठा करण्याकरीता सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. साप्रवि/409/एम. दि. 01/10/2021 अन्वये मंजूर दर असून दर करातील अनु. क्र. 42 अन्वये रु. 1.84/- प्रती शंभर प्रमाणे रु. 2594400/- खर्चास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.